माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: १८९/२०२१**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| श्री. हेमंत गांजरे, ८७ पहिला माळा, विठ्ठल नगर-२, नागपूर | शिक्षण विभाग (माध्य), जिल्हा परिषद, नागपूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर |

**सुनावणी दिनांक १९.१२.२०२४**

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार दिनांक २६.११.२०२१ (प्राप्त दिनांक २६.११.२०२१) रोजीच्या अर्जान्वये आयोगाकडे थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यानुषंगाने सदर तक्रारीवर आज दिनांक १९.१२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, श्री. सुशिल बंसोड उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार द्वितीय अपील अर्ज दाखल न करता " जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३० दिवसाचा कालावधी लोटूनही प्रपत्र-अ प्रमाणे मागितलेली माहिती देण्यात आली नाही. त्यासाठी कलम ७(२) नुसार माहिती नाकारण्यात आली, असे समजते. माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(१) चा जाणिवपूर्वक भंग केल्यामुळे कलम २०(१) नुसार दंड ठोठावण्यात यावा आणि २०(२) नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी" असे कारण नमुद करुन दिनांक २६.११.२०२१ रोजी कलम १८(१) अंतर्गत थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यांत त्यांनी दिनांक २५.१०.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे प्रपत्र-अ नुसार (१) आपल्या कार्यालयाची नागरिकांची सनद प्रत देण्यात यावी (२) नागरिकांच्या सनदेनुसार तक्रारीचा निपटारा वेळेत न केल्यास तसेच सनदेत नमूद काम वेळेत पूर्ण न केल्यास संबंधीत दोषासाठी कसूरवार अधिकाऱ्यांवर करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत अधिक माहिती देण्यात यावी" अशी एकुण २ मुद्दयांवर माहितीची मागणी केली आहे.

सदर अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

त्यानंतर अपीलार्थी यांनी जोडपत्र- ब प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे सादर केल्याचे कागदपत्रे दिसून येत नाही. तसेच तक्रारकर्ता यांच्या तक्रार अर्जात काहीही नमुद केलेले नाही.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, तक्रारकर्ता यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, नागपूर यांच्या कार्यालयात दिनांक २५.१०.२०२१ रोजी माहिती अर्ज सादर केल्याचे दिसून येते. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत

कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे तक्रारकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर करणे अपेक्षीत होते. परंतु त्यांनी तसे न करता माहिती अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसाचा कालावधी संपुष्टात येताच आयोगाकडे दिनांक २६.११.२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमक्ष उपस्थित राहून तक्रारकर्ता यांनी मागितलेली नागरिकांची सनद बाबत माहितीचे एकूण ४० पृष्ठे आयोगापुढे सादर केले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सदर माहितीची पृष्ठे आयोगाकडे सादर न करता तक्रारकर्त्यास टपालाने पाठविणे अपेक्षीत होते. तसेच आज रोजी तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे त्यांना आयोगासमक्ष सादर केलेली माहिती पुरविता आली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात आयोगाकडे सादर केलेल्या माहितीची पृष्ठे तक्रारकर्ता यांना विनामुल्य पाठविण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, असे आदेशीत करुन प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात तक्रारकर्ता यांनी मागितलेली माहिती विनामुल्य् पुरवून त्याची पोहच आयोगास सादर करावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद नागपूर यांनी अर्जदार यांच्या जोडपत्र-अ नुसार विहीत मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २० (१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी सदर आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा लेखी खुलासा प्राप्त झाला नाही, तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येइल, याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना मिळेल याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३. वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक:** १८.१२.२०२४

जा.क्र. 1792 दि. 28 MAR 2025

E:\K \तक्रार क्र189-2021-गांजरे